प्रभावी संवाद कौशल्य व्यक्तिमत्व विकासाचे द्योतक - सौ श्रद्धा शिंदे

"समोरच्या व्यक्तीने आपल्याबद्दल काय व कोणता विचार करावा हे आपण स्वतः ठरवले पाहिजे. समोरच्या व्यक्तीकडून मिळणारा प्रतिसाद आपणास ठरवता आला पाहिजे. यासाठी देहबोली, उत्कृष्ट संवाद कौशल्य व उत्कृष्ट निरीक्षण करण्याचे कौशल्य आपण आत्मसात करायला हवे." असे प्रतिपादन इमेज कन्सल्टंट आणि सॉफ्ट स्किल कन्सल्टंट, कोल्हापूर येथील सौ. श्रद्धा शिंदे यांनी केले. त्या श्री व्यंकटेश महाविद्यालय येथे अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत 'प्रोफेशनल इमेज अँड एम्प्लॉयबिलिटी स्किल्स' विषयावर आधारित आयोजित एकदिवसीय कार्यशाळेमध्ये बोलत होत्या. कानांनी ऐकण्याबरोबरच डोळ्यांनी देखील ऐकण्याची कला आपण अवगत करायला हवी म्हणजेच समोरच्या व्यक्तीची देहबोली, हावभाव, इशारे यांचे बारीक निरीक्षण करण्याचे कौशल्य आत्मसात करून समोरील व्यक्ती काय बोलत आहे, त्याहीपेक्षा काय लपवत आहे हे ओळखून आपण आपले वर्तन कशा पद्धतीने ठेवायला हवे हे आपण ठरवले पाहिजे, बोलण्यातील लकब, चढ-उतार याबाबत अमूल्य मार्गदर्शन करताना विविध खेळ, ॲक्टिव्हिटी यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध टास्क देऊन व्यक्तिमत्व विकास व सॉफ्ट केली याबाबत उत्साह पूर्ण मार्गदर्शन त्यांनी केले. कार्यशाळेमध्ये दोन सत्र आयोजित करण्यात आले होते. दोन्ही सत्रांमध्ये दोन वेगवेगळ्या विषयांवर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले 'टाईम मॅनेजमेंट मेजर एम्प्लॉयबिलिटी स्किल' या विषयावर त्यांनी दुसऱ्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सोशल मीडिया, अनावश्यक गॉसिप्स, अनावश्यक फोन कॉल्स अशा बऱ्याच गोष्टींमध्ये आपण आपला बहुमूल्य वेळ वाया घालवत असतो, वेळेचा कार्यक्षमपणे वापर करण्यासाठी त्यांनी चार श्रेणी स्पष्ट केल्या महत्त्वाचे व गरजेचे काम प्रथम, महत्त्वाचे पण गरजेचे नाही, महत्त्वाचे नाही पण गरजेचे आहे व महत्त्वाचे पण नाही आणि अति गरजेचे देखील नाही अशा क्रमाने सर्वात शेवटी या क्रमानुसार कामांची वर्गवारी केल्यास कमी कालावधीत व कार्यक्षमपणे अधिक कामे पार पाडता येतात, वेळेचे कार्यक्षम व्यवस्थापन करता येते. अति महत्त्वाची, महत्त्वाची व बिन महत्त्वाची असे देखील  वर्गीकरण करता येते असे त्या आपल्या व्याख्यानात म्हणाल्या. कार्यशाळेच्या सुरुवातीस प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख अग्रणी महाविद्यालय योजनेच्या समन्वयिका डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी केले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे होते. शिवाजी विद्यापीठाने अग्रणी महाविद्यालय योजना ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबर एकत्रितपणे चार भिंतीच्या पलीकडे जाऊन शिक्षण मिळावे, पुस्तकी ज्ञाना व्यतिरिक्त व्यवहारिक ज्ञान विद्यार्थ्यांना अवगत व्हावे यासाठी अग्रणी महाविद्यालय समूह ही योजना सुरू केली. मन, मेंदू व मनगट विद्यार्थ्याने अचूकपणे वापरून आपण कोणत्याही परिस्थितीला सक्षमपणे सामोरे जाऊ अशी विचारसरणी जोपासली पाहिजे असे मत त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये व्यक्त केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापिका कु. मोहिनी आंचलिया यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार सहाय्यक प्राध्यापक श्री. एस. बी. मलघाण यांनी केले. कार्यशाळेसाठी हुपरी, हातकणंगले व इतर महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.


NAAC Re-Accreditation 'A'
ISO 9001 : 2015 Certifide
Shri Narayanrao Babasaheb Education Society's
SHRI VENKATESH MAHAVIDYALAYA, ICHALKARANJI
Organized One Day Workshop on
Professional Image and Employability Skills
Under Lead College Cluster Scheme
Shivaji University, Kolhapur
Ms. Shradha Shinde
Resource Person
Image Consultant and Soft Skill Consultant
Dr. B. N. Kamble
President,
Vice-Principal.
Dr. S. N. Jarandikar
Coordinator,
Lead College Cluster Scheme
VMI/Podium/2018-19/01
Shri N.B.Education Society's
Shri Venkatesh Mahavidyalaya,